# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.01.2025** **वार-गुरुवार**

---

**जीबीएस-अजित पवार**

पुणे शहरात सध्या गुईलेन-बॅरे सिंड्रोम या आजारानं डोकं वर काढलं आहे, मात्र हा संसर्गजन्य आजार नाही, त्यामुळं नागरिकांनी घाबरुन जाऊ नये, असं आवाहन उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार आज केलं. याबाबतच्या आढावा बैठकीनंतर ते बोलत होते. गुईलेन-बॅरे सिंड्रोम आजाराची लागण झालेल्यांची संख्या आता 59 झाली आहे, त्यामुळं काळजी घेणं गरजेचंच आहे. बहुतेक जण पुण्यातच विविध रुग्णालयात दाखल झाले आहेत, त्यांच्यावर उपचारही सुरू आहेत, याबाबत बऱ्याच वेगवेगळ्या चर्चा आणि अफवाही पसरवल्या जात आहेत; नागरिकांनी त्यावर विश्वास ठेऊ नये, असं आवाहन अजित पवार यांनी केलं आहे. पिंपरी चिंचवड शहरातही जीबीसिंड्रोमचे बारा रुग्ण आढळले आहेत. यापैकी सहा रुग्ण पूर्ण बरे झाले असून उर्वरित सहा रुग्ण रुग्णालयात दाखल आहेत; त्यांची प्रकृती स्थिर आहे अशी माहिती महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉक्टर लक्ष्मण गोपने यांनी दिली.

**वसंतदादा शुगर इंस्टीट्यूट सभा**

ऊसाचं क्षेत्र कमी होत असताना कारखाने काढल्यामुळे ते अडचणीत येतात; असं सांगून साखर कारखानदारीत काळानुसार बदल आवश्यक आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यात केलं. वसंतदादा शुगर इंस्टीट्यूटची 47वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि पारितोषिक समारंभात ते बोलत होते. ज्येष्ठ नेते शरद पवार, संस्थेचे उपाध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. कारखान्याशी संबंधित विविध घटक आणि सरकारमध्ये योग्य समन्वय असणं गरजेचं आहे, याबाबत काहीही मदत लागली तर ती दिली जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

**दिल्ली आमंत्रण**

अटल भूजल योजनेअंतर्गत भूजल व्यवस्थापनामध्ये राज्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहा 'वॉटर वारियर्स'ना दिल्लीत प्रजासत्ताक दिनी विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आलं आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे सहसंचालक डॉ. प्रवीण कथने यांनी ही माहिती दिली आहे. यात बारामती तालुक्यातील काऱ्हाटीच्या सरपंच दिपाली लोणकर यांचाही समावेश आहे.

**खासदार जनसंपर्क**

पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या खासदार जनसंपर्क सेवा अभियानाला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पुण्यात दर महिन्याला हे अभियान राबवण्यात येत आहे. आतापर्यंत कोथरूडसह कसबा, कॅन्टोन्मेंट आणि शिवाजीनगर मतदारसंघात हा कार्यक्रम झाला. या अभियानाला लोकप्रतिनिधी तसंच महानगरपालिका, आणि राज्य शासनाचे अधिकारी, तसंच पोलीस अधिकारीही उपस्थित असतात. नागरिकांच्या तक्रारी किंवा सूचना खासदार

प्रथम ऐकून घेतात, त्यानंतर त्यांना योग्य अधिकाऱ्याकडे पाठवतात. तक्रारीचा निपटारा जागेवरच करण्यावर अभियानात भर दिला जातो.

**रोजगार शिबार**

कौशल्य, रोजगार, उदयोजकता आणि नाविन्यता विभागामार्फत वैद्यकीय क्षेत्रातील अर्हताप्राप्त उमेदवारांना इस्राईल देशात 'घरगुती सहायक' या पदाकरता रोजगाराची संधी उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांना या संधीचा लाभ घेता यावा यासाठी पुणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उदयोजकता मार्गदर्शन केंद्रात उद्या सकाळी 11 वाजता एक शिबर घेण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्राचे प्रभारी सहायक आयुक्त सागर मोहिते यांनी दिली आहे. अधिक माहितीसाठी maharashtrainternational.com या संकेतस्थळाला भेट द्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

**पुरस्कार**

नाट्यसंपदा प्रतिष्ठानच्या वतीनं देण्यात येणारा गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर पुरस्कार या वर्षी जयपूर घराण्याच्या ज्येष्ठ गायिका गुरू विदुषी मीरा पणशीकर यांना जाहीर झाला आहे. याबरोबरच ज्येष्ठ संवादिनीवादक पंडित प्रमोद मराठे आणि डॉ. अरविंद थत्ते या दोघांना गानसरस्वती किशोरी आमोणकर संगतकार पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे. नाट्यसंपदा प्रतिष्ठानचे विश्वस्त पंडित रघुनंदन पणशीकर यांनी आज ही माहिती दिली. पहिला अजित बेलवलकर स्मृती युवा पुरस्कार सरोदवादक अनुपम जोशी यांना जाहीर झाला आहे. येत्या 7 ते 9 फेब्रुवारी दरम्यान पुण्यात होणाऱ्या 11व्या गानसरस्वती महोत्सवात हे सर्व पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

**लॉजिस्टिक्स कौशल्य**

युवकांना विविध प्रकारच्या कौशल्यांचं प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम करण्यासाठी एस. के. एफ. इंडिया आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या द्वारे तरुणांना ऑटोमोटिव्ह उद्योगाशी संबंधित अत्याधुनिक कौशल्य प्रशिक्षण दिलं जाणार आहे. याबरोबरच लॉजिस्टिक्स कौशल्यांसाठी एक उत्कृष्टता केंद्र तयार करण्याचा देखील महापालिकेचा मानस असल्याचं आयुक्त शेखर सिंह यांनी सागितलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हवामान कोरडं होतं. कमाल तापमान 32 तर किमान तापमान 12 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.उद्या आकाश निरभ्र तर संधीकळी अंशतः ढगाळ राहील राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**